महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

Rs.2/-

रविवार ❖२० जुलै २०२५ ❖वर्ष - सातवे ❖अंक ०२९ ❖ पाने - ४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024




# पालिका निवडणुका होताच १४ गावे बाहेर काढली जातील – गणेश नाईक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : कल्याण ग्रामीण विधानसभा क्षेत्रातील 14 गावे नवी मुंबई महापालिकेत समाविष्ठ करण्यावरून सत्ताधारी पक्षात कलगीतुरा सुरु आहे. त्यातच ही गावे स्थानिक स्वराज्य निवडणुकी पुरतीच नवी मुंबईत राहतील. निवडणुका झाल्यानंतर पहिल्याच सहा महिन्यात ही गावे बाहेर काढली जातील, असा गोप्यस्फोट वनमंत्री गणेश नाईक यांनी केला आहे. यामुळे पुन्हा एकदा 14 गावांचा नवी मुंबईतील समावेशाचा मुद्दा एरणीवर आला आहे. या गावांचे भवितव्य नक्की काय अशी चर्चा रंगली आहे.



कल्याण ग्रामीण विधानसभा क्षेत्रातील नवी मुंबईतून वगळलेली 14 गावे पुन्हा नवी मुंबईत घेण्यात यावी यासाठी 14 गाव सर्व पक्षीय विकास समिती प्रयत्न करत आहे. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सरकारच्या काळात तसा अध्यादेश देखील निघाला. मात्र अद्याप गावांचे दप्तर जमा झालेले नाही. वनमंत्री गणेश नाईक यांनी गावांच्या विकासासाठी अधिकचा निधी मिळावा अन्यथा ही गावे पालिकेत समाविष्ट केली जाऊ नये अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. त्यामुळे या गावांचे घोंगडे अजूनही भिजत पडले आहे.

14 गावांच्या समावेशावरुन शिवसेनेचे एकनाथ शिंदे आणि वनमंत्री गणेश नाईक यांच्यात कलगीतुरा रंगला असतानाच ही गावे महापालिका निवडणुकांपर्यंत नवी मुंबई महापालिका हद्दीत राहतील. यानंतर ही गावे वगळली जातील अशी चिन्हे दिसू लागली आहेत.

**कोणती आहेत १४ गावे ?**

**१) दहिसर, २) पिंपरी**
**३) वालिवली, ४) भंडार्ली**
**५) गोटेघर, ६) मोकाशी**
**७) उत्तरशिव, ८) नागांव**
**९) नावाळी, १०) निघु**
**११) नारीवली, १२) बामाली**
**१३) वाकळण आणि १४) बाळे**

न्यायालयाच्या आदेशानुसार राज्य निवडणूक आयोगाने महापालिका हद्दीत प्रभाग रचनेसंबंधीचा कार्यक्रम स्थानिक प्राधिकरणांना देऊ केला आहे. हा कार्यक्रम जाहीर झाल्यामुळे ही गावे महापालिका हद्दीतच राहतील अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

तर याचं 14 गावावरून वनमंत्री गणेश नाईक यांची प्रतिक्रिया आली आहे. मंत्री गणेश नाईक यांनी प्रसिद्धी माध्यमाशी बोलताना असे मसांगितले आहे कि, मी मुख्यमंत्री यांच्याकडे मागणी केली आहे, ही 14 गावे बाहेर काढा. नियमाप्रमाणे निवडणूकिची घोषणा झाल्यानंतर ती गावे आता काढता नाही येणार. परंतु निवडणूक झाल्यानंतर ती गावे काढली जातील. माननीय मुख्यमंत्री बोलले की पहिल्याचं 6 महिन्यामध्ये ती गावे आपण काढू टाकू. शेवटी नवीमुंबईच्या जनेतच्या डोक्यावर 6 हजार कोटींचा भुर्दंड आम्ही पडू देणार नाही, असे वनमंत्री नाईक यांनी सांगितले. दरम्यान, आता यावरून 14 गाव विकास समिती, मनसे, शिवसेना आणि ठाकरे गटाकडून काय प्रतिक्रिया येतात हें पहावे लागले.

# उपमुख्यमंत्री निरोगी महिला अभियानासाठी ५ कोटीचा निधी

## - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे




**ठाणे महानगरपालिका, रोटरी क्लब आणि आदित्य बिरला कॅपिटल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'उपमुख्यमंत्री निरोगी महिला' अभियानाचा आज ठाण्यातील लोकमान्य नगरमधील कोरस आरोग्य केंद्रात शुभारंभ**

**गर्भाशय मुखाचा कर्करोग, ९ ते १४ वयोगटातील मुलींसाठी एचपीव्ही लस, मधुमेह तसेच हिमोग्लोबिन तपासणी तसेच स्त्रियांच्या निरोगी आणि आरोग्यदायी जीवनशैलीबाबत संवाद याचा अंतर्भाव या शिबीरात करण्यात येणार आहे.**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : उपमुख्यमंत्री निरोगी महिला अभियानातंर्गत महिलांची गर्भाशय कर्करोग तपासणी जलदगतीने व्हावी यासाठी नगरविकास विभागाकडून ठाणे महापालिकेच्या आरोग्य विभागास पाच कोटींचा निधी देण्यात येईल अशी घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज ठाण्यात केली.

ठाणे महानगरपालिका, रोटरी क्लब आणि आदित्य बिरला कॅपिटल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'उपमुख्यमंत्री निरोगी महिला' अभियानाचा आज ठाण्यातील लोकमान्य नगरमधील कोरस आरोग्य केंद्रात शुभारंभ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी ठाणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, उपायुक्त उमेश बिरारी, डॉ.प्रसाद पाटील, डॉ.कारखानीस, आदित्य बिर्ला फाउंडेशनचे पदाधिकारी तसेच रोटरी क्लबचे महाजन आणि त्यांचे सर्व सहकारी उपस्थित होते

गर्भाशयाचा कर्करोग हा जगातील दुसरा सर्वसाधारण आढळणारा आजार असून त्यांचे निदान लवकर झाले तरच त्यावर उपाय करणे शक्य होते. आपल्या कुटुंबातील महिला भगिनी या कायम कुटुंबाकडे लक्ष देताना स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे या शिबिराकडे दुर्लक्ष न करता जास्तीत जास्त महिलांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी याप्रसंगी केले.

माझ्या लाडक्या बहिणींसाठी हे अभियान सुरू करण्यात आले असून, पुढील तीन महिन्यांत पाच लाख महिलांची विनामूल्य वैद्यकीय तपासणी या अभियानाच्या माध्यमातून करण्यात येईल, असे यावेळी जाहीर केले. सगळयात महत्त्वाचे म्हणजे गर्भाशय मुखाचा कर्करोग, ९ ते १४ वयोगटातील मुलींसाठी एचपीव्ही लस, मधुमेह तसेच हिमोग्लोबिन तपासणी तसेच स्त्रियांच्या निरोगी आणि आरोग्यदायी जीवनशैलीबाबत संवाद याचा अंतर्भाव या शिबीरात करण्यात येणार आहे. यासाठी इथे सोनोग्राफीची अद्ययावत मशीन, मॅमोग्राफीची गाडी सज्ज ठेवण्यात आली आहे. त्या माध्यमातून नामवंत डॉक्टरांची मदत घेऊन हे अभियान राबविण्यात येईल असे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ प्रसाद पाटील यांनी सांगितले.

# दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची वेळ आल्यास भाजपशी बोलावे लागले

## - प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

सर्व मतभेद दूर सारत दोन ठाकरे 5 जुलै रोजी एकाच मंचावर आले. मराठीच्या मुद्यावर त्यांनी एकला चलो रे ऐवजी 'आम्ही दोघे भाऊ एक होऊ' असे संकेत दिले. त्यानंतर राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. यापूर्वी दोन्ही खेम्यातील नेत्यांनी एकत्रिकरणाचा सूर आळवला आहे. दस्तूरखुद्द शरद पवार यांनी अगोदर विरोध पण नंतर अनुकूल संकेत दिले आहेत. आता अजित पवार राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि मंत्री छगन भुजबळ यांच्या वक्तव्यांनी पुन्हा वातावरण ढवळले आहे.

### शरद पवार यांनी काय दिले संकेत?

28 जून 2025 रोजी कोल्हापूरात माध्यमांशी बोलताना राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी मोठे वक्तव्य केले होते. मनसे आणि शिवसेना एकाच मंचावर आल्यानंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येणार का? असा सवाल शरद पवार यांना विचारण्यात आला होता. राजकारणात मतभेद विसरून एकत्र येऊन चांगले काम करणे कधीही चांगलेच. त्यामुळे सगळे मतभेद विसरून आम्ही एकत्र येत असू तर ते चांगलेच आहे असे स्पष्ट संकेत पवारांनी त्यावेळी दिले होते. सगळे मतभेद विसरून चांगले काम केले तर वाईट वाटायचे काम नाही असे दोन्ही राष्ट्रवादीच्या एकत्रीकरणावर त्यांनी भाष्य केले होते.

### भाजपाशी बोलावे लागेल

तर दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची वेळ



आल्यास भाजपशी बोलावे लागले असे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे म्हणाले. राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची वेळ जर आली तर भाजपच्या वरिष्ठ नेतृत्वाशी बोलावे लागले असे मोठे वक्तव्य तटकरे यांनी केले आहे. त्यांच्या या वक्तव्याने दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार का याविषयीची चर्चा सुरू झाली. त्यावरही तटकरे यांनी प्रतिक्रिया दिली. दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची चर्चा सध्या सुरू नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. हा मुद्दा अजून दूर दिसत आहे. माझ्यापर्यंत तरी अशी काही चर्चा आली नाही असे तटकरे म्हणाले. तर मंत्री छगन भुजबळ यांनी सुद्धा तटकरे यांच्या मताला दुजोरा दिला आहे. राष्ट्रवादीच्या विलीनीकरणासंदर्भात भाजप काय भूमिका घेतो हे अद्याप समोर आलेले नाही. पण निदान चर्चा होत आहे. दोन्ही बाजूची नेते मंडळी भूमिका आणि मतं मांडत असल्याचे दिसून येते.




# कल्याण डोंबिवलीसाठी स्वतंत्र धरणाची मागणी

## – कल्याण ग्रामीण आ. राजेश मोरे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण ग्रामीण आमदार श्री. राजेश गोवर्धन मोरे यांनी पावसाळी अधिवेशनात कल्याण डोंबिवलीकर जनतेसाठी दोन अत्यंत महत्त्वाचे मुद्दे घेतले. या मुद्द्यांचा संबंध थेट नागरिकांच्या सुरक्षितता आणि पाणीपुरवठ्या सारख्या मूलभूत गरजांशी आहे.

### पहिला मुद्दा : कल्याण डोंबिवलीसाठी स्वतंत्र धरणाची मागणी .

सध्या कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातील पाणीपुरवठा हे विविध बाह्य धरणांवर अवलंबून आहे. वाढती लोकसंख्या, नागरीकरण आणि नवनिर्मित प्रकल्पांमुळे




जलस्रोतावर ताण प्रचंड वाढला आहे. या पार्श्वभूमीवर आमदार मोरे यांनी पावसाळी अधिवेशनात थेट उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे साहेब आणि मा. ना. श्री. गिरीष महाजन साहेब, मंत्री जलसंपदा यांच्याकडे स्वतंत्र धरणाच्या मंजुरीसाठी निवेदन देऊन ठोस मागणी केली.

### दुसरा मुद्दा :– एम.आय. डी.सी. मधील जीर्ण इमारतींचा प्रश्न.

कल्याण ग्रामीण मतदारसंघातील निवासी एम.आय.डी.सी परिसरातील ३५ ते ४० वर्षांपूर्वी बांधलेल्या आणि सध्या अत्यंत धोकादायक अवस्थेत असलेल्या इमारतीं आहेत.






# गीतासार



### अध्याय १७
### श्रद्धात्रयविभागयोगः

आहारस्त्वपि सर्वस्य त्रिविधो भवति प्रियः । यज्ञस्तपस्तथा दानं तेषां भेदमिमं शृणु ॥ १७-७ ॥

भोजनही सर्वांना आपापल्या प्रकृतीप्रमाणे तीन प्रकारचे प्रिय असते. आणि तसेच यज्ञ, तप व दानही तीन तीन प्रकारची आहेत. त्यांचे हे निरनिराळे भेद तू माझ्याकडून ऐक. ॥ १७-७ ॥


आयुःसत्त्वबलारोग्य सुखप्रीतिविवर्धनाः । रस्याः स्निग्धाः स्थिरा हृद्या आहाराः सात्त्विकप्रियाः ॥ १७-८ ॥

आयुष्य, बुद्धी, बळ, आरोग्य, सुख आणि प्रीती वाढविणारे, रसयुक्त, स्निग्ध, स्थिर राहणारे, स्वभावतः मनाला प्रिय वाटणारे असे भोजनाचे पदार्थ सात्त्विक पुरुषांना प्रिय असतात. ॥ १७-८ ॥

कट्वम्ल लवणात्युष्ण तीक्ष्ण रूक्षविदाहिनः । आहारा राजसस्येष्टा दुःखशोकामयप्रदाः ॥ १७-९ ॥

कडू, आंबट, खारट, फार गरम, तिखट, कोरडे, जळजळणारे आणि दुःख, काळजी व रोग उत्पन्न करणारे भोजनाचे पदार्थ राजस माणसांना आवडतात. ॥ १७-९ ॥

# आजच्या दिवशी मानवाने १९६९ मध्ये चंद्रावर पहिले पाऊल टाकले



मानवाने 1969 मध्ये चंद्रावर पहिले पाऊल टाकले तो दिवस म्हणून चंद्र दिवस साजरा केला जातो. २० जुलै १९६९ या दिवशी अमेरिकेचे सुप्रसिद्ध अंतराळवीर नील आर्मस्ट्राँग यांच्या रूपाने मानवाने चंद्रावर पहिले पाऊल ठेवले होते. अपोलो ११ नावाच्या यानातून आर्मस्ट्राँग चंद्रावर उतरले, तेव्हा ते ३८ वर्षांचे होते.

चंद्र दिवस का साजरा केला जातो?

हा तो दिवस होता जेव्हा 20 जुलै 1969 रोजी रात्री 20:17 वाजता अपोलो 11 पृथ्वीच्या एकमेव उपग्रहावर उतरला. लँडिंगच्या सहा तासांनंतर अंतराळवीर नील आर्मस्ट्राँगने 21 जुलै रोजी पहाटे 2:56 वाजता चंद्राच्या पृष्ठभागावर पाऊल ठेवले. आर्मस्ट्राँगने पहिल्यांदा चंद्राच्या पृष्ठभागावर पाऊल ठेवले तेव्हा तो क्षण थेट प्रक्षेपित करण्यात आला.

बझ अल्ड्रिन आणि मायकेल कॉलिन्स या सहका-यांसोबत चार लाख किलोमीटरचा प्रवास तीन दिवसांत नील आर्मस्ट्राँग यांनी केला. यानाच्या बाहेर सुमारे अडीच तास घालवले. त्यांनी पृथ्वीवर परत आणण्यासाठी 21.5 किलो चंद्राची सामग्री गोळा केली. ट्रॅंक्विलिटी बेस नावाच्या साइटवर सुमारे 21 तास घालवले होते. त्यानंतर हे तिघे पृथ्वीवर परत आले आणि आठ दिवसांहून अधिक काळ अंतराळात राहिल्यानंतर २४ जुलै रोजी पॅसिफिक महासागरात उतरले.

चंद्र दिवसाचे महत्त्व

हा दिवस नासाच्या सर्वात मोठ्या यशांपैकी एक आहे. 20 जुलै रोजी, अमेरिकन अंतराळवीर नील आर्मस्ट्राँग आणि त्याचा साथीदार बझ आल्ड्रिन यांनी चंद्रावर पाऊल ठेवले आणि सुमारे 47.5 पौंड चंद्र सामग्री गोळा केली. जी त्यांनी अभ्यासासाठी पृथ्वीवर परत आणली.

हा दिवस केवळ ऐतिहासिक मोहिमेचा उत्सव साजरा करत नाही तर शास्त्रज्ञांना आशा देतो की मानव आता अंतराळात जाऊ शकतो. नील आर्मस्ट्राँगच्या "वन स्मॉल स्टेप फॉर मॅन" या भाषणाने कल्पकतेला चालना दिली आणि नाविन्य निर्माण केले.

# आंतरराष्ट्रीय बुद्धीबळ दिन

दरवर्षी २० जुलैला आंतरराष्ट्रीय बुद्धीबळ दिन म्हणून साजरा केला जातो.

असे मानले जाते की ज्या व्यक्तीला बुद्धिबळ चांगले खेळता येते त्या व्यक्तीला जीवनातील कोणत्याही परिस्थितीला सामोरे जाता येते. हा खेळ माणसाला संयम, नियोजन, आत्मविश्वास आणि शिस्त शिकवतो. बुद्धिबळाला इंग्रजीमध्ये चेस म्हणतात. चेसचे नाव ऐकलं की हा खेळ कुठल्यातरी दुसऱ्या देशाचा आहे असं वाटतं. पण प्रत्यक्षात भारताने बुद्धिबळ हा खेळ जगाला दिला आहे, पण त्यावेळी तो चतुरंगाच्या रूपाने खेळला जात होता.

44 व्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडच्या मशाल रिलेच्या शुभारंभावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चतुरंगाचा उल्लेख केला होता आणि सांगितले होते की, शतकानुशतके बुद्धिबळाची मशाल भारतातून चतुरंगाच्या रूपाने संपूर्ण जगात गेली होती. आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ दिवस दरवर्षी 20 जुलै रोजी साजरा केला जातो. कारण या तारखेला आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महासंघ (FIDE) ची स्थापना झाली. आज या निमित्ताने बुद्धिबळ खेळाच्या रंजक गोष्टी जाणून घेऊया.

चतुरंग हा भारतातील एक प्राचीन खेळ आहे. जो काळ्या आणि पांढऱ्या चौकोन असलेल्या



भारताने बुद्धिबळ हा खेळ संपूर्ण जगाला दिला आहे. प्राचीन काळी हा खेळ भारतात चतुरंग नावाने खेळला जायचा.

बोर्डवर खेळला जातो. पुराणातही याचा उल्लेख आहे. एवढेच नाही तर हडप्पा संस्कृतीत चतुरंगाचे अवशेषही सापडले आहेत. पण सहाव्या शतकात त्याचा प्रसार वाढला आणि या खेळाला लोकप्रियता मिळाली.

त्यामुळेच आजही अनेक इतिहासकार चतुरंगाची सुरुवात सहाव्या शतकापासूनच मानतात. असे म्हणतात की त्यावेळी चतुरंग 64 चौरसांच्या फलकावर खेळला जात असे. त्या वेळी हा खेळ युद्ध स्वरूपाचा होता, ज्यामध्ये पायदळ, घोडदळ, हत्ती, रथ, शूरवीर, रूक आणि बिशप इत्यादींचा समावेश होता. भारतानंतर हा खेळ पारशी लोकांमध्ये लोकप्रिय झाला आणि पारशी देशांमध्येही खेळला जाऊ लागला. अशाप्रकारे वाढत्या लोकप्रियतेसह, चतुरंग हा खेळ हळूहळू युरोप, चीन, रशिया, स्पेन इत्यादी देशांमध्ये खेळला जाऊ लागला आणि काही काळानंतर हा खेळ जगभर खूप प्रसिद्ध झाला. त्या वेळी, हा पहिला खेळ होता ज्यात खेळण्यासाठी खूप बुद्धीमत्ता लागत होती. जसजशी या खेळाची लोकप्रियता वाढत गेली तसतसे या खेळात आणि नावातही बदल होऊ लागले. दरम्यान, ते चतुरंगातून चतरंग आणि नंतर बुद्धिबळात बदलले.

### चेस नाव कसे पडले?

चतुरंगला चेस (Chess) हे नाव फ्रान्समध्ये मिळाले. असे म्हणतात की चतुरंगाचा प्रचार अनेक देशांत पसरल्यामुळे हा खेळ फ्रान्समध्ये पोहोचला तेव्हा तेथे त्याला इचेक (Echecs) असे म्हटले गेले. फ्रेंचमध्ये Echecs म्हणजे हारणे. इचेसला इंग्रजीमध्ये बुद्धिबळ असे म्हणतात. आज, हा खेळ जगभरात FIDE द्वारे नियंत्रित केला जातो, ज्याचे पूर्ण नाव Federation Internationale Des Echecs (फेडरेशन इंटरनॅशनल डी चेस) आहे. FIDE जागतिक स्तरावर बुद्धिबळ खेळांचे आयोजन करते, त्यातील विजेत्याला ग्रँड मास्टर ही पदवी दिली जाते. FIDE हे आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महासंघ किंवा जागतिक बुद्धिबळ महासंघ म्हणूनही ओळखले जाते.

# पेण येथे पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड-अलिबाग व पेण एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दि.22 जुलै, 2025 रोजी सकाळी 10.00 ते दुपारी 02.00 या वेळेत भाऊसाहेब नेणे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, पेण ता.पेण येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा व मुख्यमंत्री युवाकार्य प्रशिक्षण योजना (Internship) उमेदवार निवड मेळावा आयोजित करण्यात आला असून जिल्ह्यातील जास्तीत जास्त बेरोजगार उमेदवारांनी या रोजगार मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मागदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त श्रीम.अ.मु.पवार यांनी केले आहे.

जिल्ह्यातील नामांकीत आस्थापनांकडील रिक्तपदांच्या/ ॲप्रेंटिसशिपची भरतीसाठी रोजगार मेळावा आयोजित केला आहे. या मेळाव्यात एस.एस.सी./एच.एस.सी, आय.टी.आय., डिप्लोमा इंजिनियर, पदवी इंजिनियर, व इतर पदवी धारक नोकरी इच्छूक उमेदवारांची प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे निवड केली जाणार आहे. या विभागाच्या संकेतस्थळावर नोंदणी केलेल्या उमेदवारांना ऑनलाईन पध्दीतीने अर्ज करता येईल. प्रथम https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावरील Employment- Job Seeker (Find A Job)- Job Seeker Login याक्रमाने जाऊन आपल्याकडील युजर आयडी व पासवर्ड वापरुन आपली शैक्षणिक माहीती अद्ययावत करून त्यातील Pandit Dindayal Upadhyay Job Fair या ऑप्शनमधून आपला जिल्हा निवडून जिल्ह्याच्या नावावरील Vacancy Listing-I Agree व दिसणाऱ्या विविध पदाना आपल्या शैक्षणिक अर्हतेप्रमाणे ऑनलाईन अप्लाय करावे. व तसेच मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनामध्ये इंटर्शिपला अप्लाय करण्यासाठी https://cmykpy.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावरील Intern Login ला क्लिककरुन आपल्याकडील युजर आयडी व पासवर्ड वापरुन आपली प्रोफाईल व शैक्षणिक माहीती अद्ययावत करुन Apply for Jobs ला क्लिककरुन आपला जिल्हा निवडून दिसणाऱ्या आस्थापनेच्या रिक्तपदांना Apply करावा.

रोजगार मेळाव्यातील रिक्त पदांची माहिती https://rojgar.mahaswayam.gov.in यासंकेतस्थळावर उपलब्ध आहे. संकेतस्थळावर ऑनलाईन अप्लाय करताना काही समस्या असल्यास या कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक 02141-222029 वर संपर्क साधावा.

# प्रधानमंत्री पीक विमा योजना सन २०२५

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : विविध नैसर्गिक आपत्तीमुन्ने पिकांच्या होणाऱ्या नुकसानीपासून शंतकत्यांना आर्थिक संरक्षण देण्याच्या दृष्टिकोनातून प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीव हंगाम 2016 पासून राज्यात राबविण्यात येत आहे. सदरची योजना खरीप हंगाम 2023 ते रब्बी हंगाम 2024-25 मध्ये रु.1 प्रति अर्ज भरुन सर्वसमावेशक पीक विमा योजना राबविण्यात आली. सदर कालावधीत राबविलेल्या योजनेचा आढावा घेतल्यानंतर त्यामध्ये सुधारणा करुन, राज्य शासनाने सन 2025-26 या वर्षाकरिता उत्पादनावर आधारित सुधारित पीक विमा योजना राबविण्यास मान्यता दिली आहे.

ठाणे जिल्ह्यात भात व नाचणी ही पिके सदर योजनेतर्गत अधिसूचित आहेत. भात व नाचणी पिकासाठी निर्धारित केलेल्या विमा हप्त्याचा शेतकरी हिस्सा अनुक्रमे रक्कम रु.457.50/- व रक्कम रु.87.50/- एवढा विमा हप्ता भरून शेतकऱ्यास विमा योजनेत सहभागी होता येणार आहे.

नैसर्गिक आपत्ती, कीड आणि रोगासारख्या प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण देणे.

पिकांच्या नुकसानीच्या अत्यंत कठीण परिस्थितीतहो शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखणे.

शेतकऱ्यांना नाविन्यपूर्ण व सुधारित मशागतीचे तंत्रज्ञान व सामुग्री वापरण्यास प्रोत्साहन देणे.

कृषी क्षेत्रासाठीच्या पत पुरवठ्यात सातत्य राखणे, जेणेकरुन उत्पादनातील जोखमीपासून शेतकऱ्यांच्या संरक्षणाबरोबरच अन्न सुरक्षा, पिकांचे विविधीकरण आणि कृषी क्षेत्राचा गतिमान विकास व स्पर्धात्मकतेत वाढ हे हेतू साध्य होण्यास योजनेमुळे मदत होत आहे.

योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये : 1. सदरची योजना ही या आदेशान्वये अधिसूचित केलेल्या पिकांसाठी केवळ अधिसूचित क्षेत्रासाठी लागू असेल. 2. प्रधानमंत्री पीक विमा योजना कर्जदार, तसेच, बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक आहे. 3. अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकासाठी खातेदारांचे व्यतिरिक्त कुळाने अगर भाडेपट्टीने शेती करणारे शेतकरी या योजनेत भाग घेण्यास पात्र आहेत. मात्र भाडेपट्टीने शेती करणारास नोंदणीकृत (रजिस्टर्ड) भाडेकरार पीक विमा संकेतस्थळावर अपलोड करणे बंधनकारक आहे. 4. अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांचे उंबरठा उत्पादन हे मागील 7 वर्षापैको सर्वाधिक उत्पादनाच्या 5 वर्षाचे सरासरी उत्पादन गुणीले त्या पिकाचा जोखिमस्तर विचारात घेवून निश्चित केले जाईल. 5. या योजनेत मृत शेतकऱ्यांच्या नावे, तसेच, इतर अवैध मार्गानी विमा काढला गेल्यास तो अर्ज रद्द करण्यात येईन. 6. योजनेमध्ये सहभागासाठी शेतकरी ओळखपत्र क्रमांक (AGRISTACK Farmer ID) असणे अनिवार्य असेल. 7. पीक विमा नुकसान भरपाईसाठी. ई-पीक पाहणी अंतर्गत पिकांची नोंद करणे बंधनकारक राहील.

जोखमीच्या बाबी - योजने अंतर्गत खरीप व रब्बी हंगामाकरिता पीक पेरणीपासून काढणीपर्यंतच्या कालावधीत विविध नैसर्गिक आपत्ती किंवा पीक उत्पादनावर विपरीत परिणाम करणाऱ्या इतर बाबीमुळे हंगामाच्या शेवटी, पीक कापणी प्रयोग आधारे / तांत्रिक उत्पादन आधारे, सदर महसूल मंडळामध्ये पिकाच्या उंबरठा उत्पादनाच्या तुलनेत येणारी घट गृहीत धरून नुकसान भरपाई देय राहील

विमा योजनेत सहभागी होण्याकरिता - अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकासाठी पीक कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यास या विमा योजनेत सहभाग बंधनकारक नाही. मात्र त्यासाठी शेतकऱ्याने विमा योजनेत भाग घेण्याच्या अंतिम दिनांक आधी किमान 7 दिवस संबंधित बँकेस विमा हप्ता न भरणे बाबत लेखी कळवणे गरजेच आहे. इतर बिगर कर्जदार शेतकऱ्याने आपला 7/12 चा उतारा, बँक पासबुक, आधार कार्ड, पीक पेरणीच स्वयंघोषणापत्र घेऊन प्राधिकृत बँकेत विमा अर्ज देवून, हप्ता भरून सहभाग घ्यावा. हप्ता भरलेली पोहोच पावती त्याने जपून ठेवावी.

कॉमन सर्विस सेंटर आपले सरकारच्या मदतीने आपण विमा योजनेत सहभाग घेऊ शकता किंवा www.pmfby.gov.in या पोर्टलचे सहाय्य घेऊ शकता.

योजनेत सहभागाची अंतिम मुदत - दि.31 जुलै 2025

योजना राबविणारी विमा - कंपनी भारतीय कृषी विमा कंपनी

ई-मेल - pikvima@aicofindia.com

कृषी रक्षक पोर्टल हेल्पलाईन क्रमांक - 14447

महत्त्वाच्या नवीन बाबी - या योजनेत आपण जे पीक शेतात लावले आहे. त्याचाच विमा घ्यावा, शेतात विमा घेतलेले पीक नसेल तर आपणास विमा नुकसान भरपाई पासून वंचित रहावे लागेल. शेतातील पीक आणि विमा घेतलेले पीक यात तफावत आढळल्यास ई-पीक पाहणी मधील नोंद अंतिम धरण्यात येईल. म्हणून सर्व शेतकऱ्यांनी आपल्या पिकांची नोंद ई-पीक पाहणी मध्ये वेळेवर करावी.

तरी प्रधानमंत्री पिक विमा योजनेत सहभागी होण्याकरीत शेवटचे 15 दिवस शिल्लक राहिले असून जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी आपल्या पिकाचा विमा काढून घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी ठाणे रामेश्वर पाचे यांनी केले

## बेरोजगार उमेदवारांकरिता स्वंयरोजगार मेळाव्याचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : बेरोजगार उमेदवारांना स्वंयरोजगारा विषयी माहिती व्हावी यासाठी आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ महाराष्ट्र या उपक्रमाविषयी माहिती स्वंयरोजगार करु इच्छिणाऱ्या बेरोजगार तरुणांपर्यंत पोहचावी यासाठी मंगळवार, दि.22 जुलै, 2025 रोजी सकाळी 10.00 ते दुपारी 02.00 वाजेपर्यंत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र रायगड-अलिबाग येथे स्वंयरोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून जिल्ह्यातील जास्तीत जास्त बेरोजगार उमेदवारांनी या रोजगार मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मागदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त श्रीम.अ.मु.पवार यांनी केले आहे.

# जि.प.केंद्रशाळा भूवन येथे एक पेड माँ के नाम उपक्रम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : शालेय शिक्षण मंत्रालय आणि पर्यावरण व वन मंत्रालय भारत सरकारने ५ जून रोजी पर्यावरण दिनानिमित्त Eco Clubs for Mission LiFE या संकल्पनेतून "एक पेड माँ के नाम २.०" या उपक्रमांतर्गत मुरबाड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा भूवन येथे विद्यार्थ्यांनी उत्साहाने आपल्या आईच्या नावाने वृक्षारोपण केले.

'एक पेड माँ के नाम' या उपक्रमाचा मुख्य उद्देश प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या आईच्या नावाने झाड लावणे व संवर्धन करणे हा आहे, त्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या पालनपोषण करण्यात आणि धरणी मातेच्या समृद्धतेमध्ये योगदान देणाऱ्या आईच्या भूमिकेचा सन्मान करणे. झाडे जीवनदायी असतात आणि आईप्रमाणेच ती पुढच्या पिढीसाठी पोषण, संरक्षण आणि भविष्य प्रदान करतात. या





उपक्रमाद्वारे, सहभागी विद्यार्थी केवळ त्यांच्या आईच्या सन्मानार्थ एक कायम स्मृती निर्माण करत नाहीत तर पर्यावरण संवर्धनाच्या अभियानात देखील योगदान देत आहेत.

आईसाठी वृक्षारोपण व आईसोबत वृक्षारोपण करण्यासाठी विद्यार्थ्यांनी जे रोपटे लावले ते या शाळेतील सातवीच्या विद्यार्थ्यांनी शाळेच्या रोपवाटिकेत तयार केलेली रोपे होती. या शाळेचे माजी विद्यार्थी तथा शेतीनिष्ठ प्रगत शेतकरी कृष्णाभाऊ गायकर यांच्या सहकार्याने शाळेतील सातवीच्या विद्यार्थ्यांनी शालेय रोपवाटिकेत कार्यानुभव विषयांतर्गत जांब पेरुची व कडूनिंबाची जवळ जवळ शंभर रोपे तयार करून विद्यार्थ्यांना वाटण्यात आली. हि रोपे विद्यार्थ्यांनी आपल्या घराच्या आवारात व शेतावर आपल्या आईच्या सोबत लावली. हे या उपक्रमाचे दुहेरी यश आहे. आईसाठी, आईसोबत, झाड लावताना आठवण म्हणून फोटो व सेल्फी घेतले. या उपक्रमाच्या प्रमुख सौ. जयश्री शेलवले यांनी सर्व विद्यार्थ्यांचे आईसोबत वृक्षारोपणाचे फोटो एकत्रित करून https://ecoclubs.education.gov.in/ या वेबसाईटवर अपलोड केले व प्रत्येक विद्यार्थ्याला आईसोबत झाड लावताना असलेला फोटो आणि स्वतःचे व आईचे नाव असलेले सुंदर असे प्रमाणपत्र डाऊनलोड करुन दिले. त्यामुळे विद्यार्थ्यांना व त्यांच्या मातांना या उपक्रमात सहभागी होतांना खूप आनंद झाला.

या उपक्रमातून आईच्या सन्मानार्थ वृक्षारोपण करून मुलांना, पालन करणारी जन्मदात्री माता व पोषण करणारी धरणीमाता यांचे महत्त्व सांगणारा हा उपक्रम राबविणा-या उपक्रमशील शिक्षिका सौ. जयश्री शेलवले आणि जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा भूवनचे मुख्याध्यापक बाळकृष्ण गायकवाड, सहशिक्षक, राजाराम सोंगाळ, बाळकृष्ण ईसामे, दिलीप खाटेघरे या सर्वांचे भूवन केंद्राचे केंद्रप्रमूख गुरुनाथ घुडे यांनी उल्लेखनिय काम केल्याबद्दल अभिनंदन केले.

## आरोग्य
# रोग प्रतिकारकशक्ती वर्धक जायफळ



एकीकडे मान्सून ऋतू थंडावा, हिरवळ आणि रिमझिम पाऊस घेऊन येतो, तर दुसरीकडे तो सर्दी, घसा खवखवणे, थकवा आणि वारंवार होणाऱ्या विषाणूजन्य आजारांचे कारण बनतो. अशा परिस्थितीत, केवळ छत्री किंवा रेनकोटनेच नव्हे तर शरीराच्या अंतर्गत रोगप्रतिकारक शक्तीने देखील स्वतःला बळकट करणे महत्वाचे आहे.

रोगप्रतिकारक शक्ती वाढवणाऱ्या आहारात आले, तुळस आणि हळद सोबत हळद देखील पावसाळ्यात शरीराचे संक्रमण होण्यापासून संरक्षण करण्यासाठी फायदेशीर आहे. पावसाळ्यात शरीराची रोग प्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी जायफळाचा चहा पिण्याचे फायदे जाणून घ्या.

अँटी-बॅक्टेरियल आणि अँटी-व्हायरल गुणधर्म

जायफळमध्ये आढळणारे सक्रिय संयुगे शरीराची बॅक्टेरिया आणि विषाणूंशी लढण्याची क्षमता मजबूत करतात. हे विशेषतः घसा खवखवणे, बंद नाक आणि शिंका येणे कमी करण्यासाठी उपयुक्त आहे.

नैसर्गिक डिकॉन्जेस्टंट

जायफळ श्लेष्मा सैल करते आणि श्वसनमार्ग साफ करण्यास मदत करते, ज्यामुळे खोकला आणि सर्दीपासून त्वरित आराम मिळतो.

झोप आणि ताणतणावासाठी उपयुक्त

खोकला आणि सर्दीमुळे रात्री झोप येत नाही का? जायफळाचा चहा प्यायल्याने शरीराला आराम मिळतो आणि चांगली झोप येते, ज्यामुळे लवकर बरे होता येते.

काळजी घ्या

जायफळाचे प्रमाण नेहमीच मर्यादित ठेवा. जास्त प्रमाणात सेवन करणे हानिकारक असू शकते. गर्भधारणेदरम्यान, मुलांमध्ये किंवा कोणत्याही गंभीर आजारात ते वापरण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्या.




**मेष**

अभ्यास आणि अध्यापनाशी संबंधित लोकांसाठी आजचा दिवस चांगला आहे. तुम्हाला लवकरच मोठे यश मिळणार आहे.तुमचे कौटुंबिक जीवन आनंदी राहील.

**वृषभ**

आजचा दिवस आनंदात व्यतीत कराल. तुम्हाला तुमच्या मुलाकडून एखादी चांगली बातमी मिळेल.तुमचे मन प्रसन्न राहील. शैक्षणिक कार्यात यश मिळेल.

**मिथुन**

व्यवसाय करणाऱ्यांना चांगल्या कंपनीत सहभागी होऊन व्यवसाय वाढवण्याची सुवर्णसंधी मिळेल. व्यवसायाशी संबंधित प्रवास करावा लागेल.

**कर्क**

जुन्या जमिनीच्या मालमत्तेतून तुम्हाला चांगला नफा मिळेल. सरकारी क्षेत्रात चांगली नोकरी मिळेल. तुम्ही आणि तुमचे कुटुंब खूप आनंदी व्हाल.

**सिंह**

व्यावसायिकांसाठी दिवस चांगला आहे.या काळात तुम्ही तुमचे आरोग्य सुधारण्याचा प्रयत्न कराल.नोकरीत पदोन्नती तसेच उत्पन्नात वाढ होण्याची शक्यता आहे.

**कन्या**

लेखन इत्यादी कार्यातून तुमचा मान-सन्मान वाढेल. कामाच्या ठिकाणी अधिकाऱ्यांशी सुसंवाद राखाल. प्रगतीच्या संधी मिळतील. खेळांमध्ये भाग घेऊ शकता.

**तूळ**

काही अनुभवी लोक भेटतील. ज्यामुळे तुम्हाला भविष्यात फायदा होईल. व्यवसायात चांगला नफा मिळेल. कार्यालयात सहकाऱ्यांशी चांगला समन्वय राहील.

**वृश्चिक**

अनावश्यक खर्च टाळावा.कामाच्या ठिकाणी तुम्ही तुमच्या कामात काही नवीन कल्पना आणाल. तुमच्या सकारात्मक वृत्तीमुळेच तुम्हाला नोकरीत बढती मिळेल.

**धनु**

तुमचे कौटुंबिक जीवन खूप आनंददायी असणार आहे. तुमचे ध्येय साध्य करण्यासाठी तुम्ही तयार असाल. तुमच्या वैवाहिक जीवनात सुंदर समन्वय राहील.

**मकर**

कठोर परिश्रम आणि सकारात्मक वर्तनाने कठीण परिस्थितीतून बाहेर पडाल. पैशाच्या व्यवहारात थोडे सावध राहा. तुमचे वैवाहिक जीवन चांगले राहील.

**कुंभ**

वरिष्ठ तुमच्या कामावर खूश होतील. बढती मिळण्याची शक्यता आहे. तुमचा पगारही वाढू शकतो. कामाच्या ठिकाणी घेतलेले निर्णय तुम्हाला चांगले परिणाम देतील.

**मीन**

आज अपेक्षेपेक्षा जास्त लाभ होण्याची शक्यता आहे. वैवाहिक संबंध मजबूत करण्यासाठी जोडीदाराला भेटवस्तू द्याल. नकारात्मक विचार टाळले पाहिजेत.






## चेतना नाका ते नेवाळी नाका आणि यु टाईप रस्त्याची होणार उभारणी

### २०१ कोटी रुपयांच्या निधीला मान्यता

### डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या पाठपुराव्याला यश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे कल्याण पूर्वेतील चेतना नाका ते नेवाळी नाका रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करण्यात येणार असून यासाठी एमएमआरडीएने १२४ कोटी रुपयांच्या निधीला प्रशासकीय मान्यता दिली असून लवकरच रस्त्याच्या कामाची निविदा काढली जाणार आहे. तर कल्याण पूर्वेतील काटेमानिवली, सिद्धार्थनगर, तीसगाव नाका हा यू टाइप रस्ता महत्वाचा रस्ता आहे. या रस्त्याच्या सिमेंट कॉंक्रिटीकरणाकरिता एमएमएमआरडीएने ७४ कोटी रुपयांच्या निधीला प्रशासकीय मान्यता दिली. रस्त्याच्या कामाचीही निविदा लवकरच काढली जाणार आहे. हा रस्ता झाल्याने कल्याण पूर्वेतील वाहतुकीला अधिक गती मिळणार आहे.

कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या पुढाकाराने मतदारसंघात अनेक महत्वाकांक्षी प्रकल्प मार्गी लागत आहे. कल्याण रींग रोड, मेट्रो प्रकल्प, उड्डाणपूल, खाडीवरील पूल यांसह मतदारसंघातील विविध शहरांमध्ये कोट्यवधी रुपयांच्या निधीतून पूर्णत्वास गेलेले सिमेंट कॉंक्रिटीचे रस्ते यामुळे मतदारसंघातील वाहतूक अधिक सुरळीत झाली आहे. याच पार्श्वभूमीवर कल्याण शहरातील वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाचे असलेल्या दोन रस्त्यांना प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

कल्याण पूर्वेतील चेतना नाका ते नेवाळी नाका रस्ता सिमेंट कॉंक्रिटीकरणाचा करण्यात यावा, अशी मागणी होती. या मागणीनुसार हा रस्ता सिमेंट कॉंक्रिटीकरणाचा करण्यात येणार आहे. या रस्त्याच्या सिमेंट कॉंक्रिटीकरणासाठी एमएमआरडीएने १२४ कोटी रुपयांच्या निधीला प्रशासकीय मान्यता दिली. लवकर रस्त्याच्या कामाची निविदा काढली जाणार आहे. कल्याण चेतना नाका ते नेवाळी हा महत्त्वपूर्ण रस्ता आहे. कल्याणहून हा रस्ता मलंग गडाकडे जातो, तसेच तो नेवाळी नाक्यावर अंबरनाथमध्ये काटई रस्त्याला मिळतो. या रस्त्याने खोणी तळोजाकडे, पनवेल, पुणे, नवी मुंबई, बदलापूर, कर्जतकडे जाता येते. हा रस्ता कल्याण ग्रामीण आणि कल्याण पूर्व या दोन्ही विधानसभा मतदारसंघांना जोडणार आहे. हा रस्ता सिमेंटचा करण्यात यावा, अशी मागणी होती. यानुसार खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी पाठपुरावा केला आणि रस्त्याला मंजुरी मिळाली.

तसेच तर कल्याण पूर्वेतील काटेमानिवली, सिद्धार्थनगर, तीसगाव नाका हा यू टाइप रस्ता महत्त्वाचा रस्ता आहे. या रस्त्याच्या सिमेंट कॉंक्रिटीकरणाकरिता एमएमएमआरडीएने ७४ कोटी रुपयांच्या निधीला प्रशासकीय मान्यता दिली. रस्त्याच्या कामाचीही निविदा लवकरच काढली जाणार आहे. हा रस्ता झाल्याने कल्याण पूर्वेतील वाहतुकीला अधिक गती मिळणार आहे. या रस्त्यांच्या मंजुरीसाठी आणि निधीची उपलब्धता करून दिल्याबद्दल खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले आहेत.

## उत्सवांसाठी सार्वजनिक मंडळाचे मंडप शुल्क माफ करा - शिवसेनेची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : श्रावण महिना अवघ्या काही दिवसात सुरु होणार असून आ श्रावण महिन्यात अनेक सण उत्सव साजरे होत असतात. त्यामुळे गोपाळकाला, गणेशोत्सव व नवरात्रौत्सव सार्वजनिक मंडळाचे मंडप शुल्क माफ करण्याची मागणी शिवसेनेने केली असून याबाबत शिवसेना कल्याण शहर प्रमुख रवी पाटील यांनी केडीएमसी आयुक्तांना पत्र दिले आहे.

येत्या काळात सार्वजनिक गोपाळकाला, गणेशोत्सव व नवरात्रौत्सव येत आहेत. हिंदू धर्मियांचे महत्वाचे सण असुन कल्याण डोंबिवली शहराला एक सामाजिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक परंपरा आहे. त्या दृष्टीने सर्व सणासाठी लागणारे मंडप शुल्क तातडीने बैठक घेऊन माफ करावे अशी मागणी रवी पाटील यांनी केली आहे.




# लव्ह जिहाद : धर्मनिरपेक्षतेच्या आड दडलेले जिहादी आक्रमण'

**- सुनील घनवट, राज्य संघटक, महाराष्ट्र व छत्तीसगड, हिंदु जनजागृती समिती**

सध्या महाराष्ट्रात विविध माध्यमातून हिंदूंचा बुद्धिभेद करून धर्मा पासून दूर नेण्याचा विडाच जणू काहींनी उचलला आहे. विविध नावाखाली करत आहे. कुठे वारीमध्ये समरसता वारी या गोंडस नावाखाली श्रद्धेला तडा देण्याचे कार्य होतांना दिसत तर कुठे हिंदूंचा वंशविच्छेद करणाऱ्या लव्ह जिहाद सारख्या महाभायंकर षडयंत्राला काल्पनिक प्रचार असल्याचे सांगून हिंदूंचा बुद्धिभेद करण्यात येत आहे. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या (अंनिस) एका कार्यकर्त्याने 'लव्ह जिहाद' ही कल्पना न्यायालय, सरकार किंवा तपास यंत्रणांनी सिद्ध केलेली नाही. या संकल्पनेचा वापर मुस्लिमद्वेष आणि राजकीय ध्रुवीकरणासाठी होतो. काही राज्यांनी यासंदर्भात कायदे केले, पण त्यात स्पष्ट पुरावे किंवा व्याख्या नाही. 'लव्ह जिहाद' हा एक राजकीय प्रचार असून तो समाजात भीती आणि द्वेष पसरवतो. थोडक्यात 'लव्ह जिहाद' ही एक तथ्याधारित नसलेली, राजकीय हेतूने पसरवलेली सामाजिक भीतीची संकल्पना आहे असे मत 'लव्ह जिहाद : भ्रम आणि वास्तव' या लेखात मांडले आहे, आणि एका प्रसिद्धी माध्यमांनी याला प्रसिद्धी पण दिली आहे. अंनिस ने यावर कुठेही आक्षेप घेतला नाही म्हणजे याला अंनिस चे समर्थन आहे असे समजायचे का? 'लव्ह जिहाद' ही संकल्पना केवळ एक राजकीय प्रचार असल्याचा आरोप अनेक पुरोगामी मंडळी करतात, मात्र प्रत्यक्ष वास्तव त्यांच्या दाव्यांना छेद देते.

या संबंधात न्यायालयात सुरु असलेले अनेक खटले, तपास यंत्रणांनीसमोर आणलेले पुरावे आणि विविध राज्य सरकारांच्या कारवाईतून 'लव्ह जिहाद'चे अस्तित्व वेळोवेळी स्पष्ट झाले आहे.

श्रद्धा वालकरच्या शरीराचे तुकडे करणारा आफताब असो, की रूपाली चंदनशिवेची भररस्त्यात गळा चिरणारा इक्बाल शेख ही प्रकरणे नुसते क्रौर्य दाखवत नाहीत, तर एका जिहादी मानसिकतेचा सूक्ष्म पण भयावह चेहरा उघड करतात. समाजातील अशा असंख्य घटनांची साखळी पाहता 'लव्ह जिहाद' ही केवळ एक कल्पना नाही, तर भयावह वास्तव असल्याचे स्पष्ट करते. केरळ आणि कर्नाटक उच्च न्यायालयांचे निरीक्षण, पोलिस व गुप्तचर संस्थांचे अहवाल, तसेच उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, गुजरात आदी राज्यांनी या संदर्भात केलेले कायदे हे 'लव्ह जिहाद'चे वास्तव अधोरेखित करतात. त्यामुळे 'लव्ह जिहाद' ही सामाजिक वास्तवाशी संबंधित, धर्म आणि राष्ट्रहिताच्या दृष्टीने गंभीर चिंतनाचा विषय असून, त्याचे अस्तित्व नाकारणे म्हणजे हिंदु तरुणींच्या सुरक्षेच्या प्रश्नावर दुर्लक्ष करणे होय.

### कर्नाटक आणि केरळमध्ये लव्ह जिहादचे थैमान !


काही वर्षांपूर्वी केरळ उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती के.टी. शंकरन् यांनी लव्ह जिहादचे अस्तित्व मान्य करून त्या वेळेचे केरळचे मुख्यमंत्री अच्युतानंदन यांना त्याची चौकशी करण्याचे आदेश दिले होते. तेव्हा त्यांना लव्ह जिहादची शेकडो प्रकरणे आढळून आली होती. काही वर्षांपूर्वी कर्नाटक उच्च न्यायालयात लव्ह जिहादमध्ये फसलेल्या एका तरुणीने खटला प्रविष्ट केला होता. या खटल्याच्या निमित्ताने कर्नाटकच्या गुन्हे अन्वेषण विभागाने ('सीआयडी'ने) चौकशी केली असता 'एकट्या कर्नाटकात प्रतिवर्षी अनुमाने ३६ सहस्र हिंदु मुली लव्ह जिहादला बळी पडतात', असे दिसून आले.

### लव्ह जिहाद करण्यासाठी साम, दाम, दंड, भेद चा वापर निर्दयी !

'भारतात प्रतिवर्षी सहस्रो हिंदु मुली लव्ह जिहादच्या बळी ठरतात', हे वास्तव आहे. मध्यंतरी हिंदु धर्मातील कोणत्या जातीच्या मुलीला लव्ह जिहादच्या जाळयात फसवणाऱ्या मुसलमान तरुणाला किती लाखांचे पारितोषिक मिळेल, याचे एक मूल्य(दर)पत्रकच प्रसिद्ध झाले होते. 'हिंदु मुलींना जाळयात अडकवण्यासाठी साम, दाम, दंड, भेद या सर्वच मार्गांचा वापर करण्यात येतो', हेही दिसून आले आहे. हिंदु नाव आणि हिंदु वेश धारण करणे, कपाळावर टिळा लावणे इत्यादी मार्गाने अनेक हिंदु मुली लव्ह जिहादच्या जाळ्यात अडकल्या आहेत. राष्ट्रीय शूटर तारा सहदेव वर्ष २०१४ मध्ये 'रणजीत कोहली' उर्फ रकीबुल हसनच्या लव्ह जिहादच्या जाळयात अडकली; त्याने आणि त्याच्या आईने हिंदू असल्याचे खोटे भासवून तिच्याशी विवाह केला आणि फसवणूक केली. वैद्यकीय क्षेत्र, न्यायदान करणारी महिला, आय.ए.एस्.ची सिद्धता करणारी तरुणी अशा सर्वच क्षेत्रांतील मुलीही फसत चालल्याने हे गंभीर आहे. हरियाणातील बल्लभगडमधील अग्रवाल महाविद्यालयाच्या प्रवेशद्वाराबाहेर हिंदु तरुणी निकिता तोमर हिची तौसिफ याने गोळ्या झाडून हत्या केली. 'लव्ह जिहाद'चा कायदा अस्तित्वात असता तर ? आज निकिता तोमर जिवंत असती. निकिता तोमर हिच्या हत्येस जबाबदार कोण ? 'लव्ह जिहाद अस्तित्वात नाही', असे म्हणणाऱ्यांनी याचे उत्तर द्यायला हवे.

### मुलींना आमिष दाखवून लव्ह जिहादला बळी पडण्याचे षडयंत्र!

याविषयी ताजे उदाहरण घ्यायचे झाल्यास जमालुद्दीन उपाख्य 'छांगूर बाबा' चे घेऊ शकतो. राज्यातील धर्मांतराचा सूत्रधार 'छांगूर बाबा' याला ५ जुलैला आतंकवादविरोधी पथकाने बलरामपूर येथून



अटक केली. त्याच्यावर ५० सहस्र रुपयांचे बक्षीस होते. जमालुद्दीन स्वतःला हाजी पीर जमालुद्दीन म्हणवून घेत असे. तो मुलींना आमिष दाखवून धर्मांतर करण्यास भाग पाडत असे. विशेष असे की, हिंदु मुलींच्या जातीनुसार त्यांचे दर निश्चित करण्यात आले होते. हे काम करण्यासाठी त्याच्या ४० पेक्षा अधिक बँक खात्यांमध्ये तब्बल १०० कोटी रुपयांचा निधी होता. जमालुद्दीन याने पाकसह अनेक मुसलमान देशांमध्ये किमान ४० वेळा प्रवास केला होता. त्याने 'शिजर-ए-तैयबा' नावाचे एक पुस्तकही प्रकाशित केले होते. याचा वापर करून तो हिंदूंचा बुद्धीभेद करत असे. छांगुर बाबाची योजना उत्तरप्रदेशातील जिल्ह्यांची लोकसंख्येची रचना पालटून तेथे इस्लामी राष्ट्र स्थापन करण्याची होती, अशीही माहिती पोलिसांना मिळाली.

दुसरे उदाहरण नुकते 2 महिन्यांपूर्वी भोपाळ मध्ये उघड झालेले ' लव्ह जिहाद रॅकेटचे' आहे. लग्झरी लाइफस्टाईलचे आमिष दाखवून हिंदू मुलींना जाळयात अडकवणे, या प्रकरणात मुलींना अडकविण्यासाठी महिलांचे सहाय्य घेतल्याचेही उघडकीस आले आहे.

या प्रकरणा संदर्भात राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाने मोठे खुलासे केले आहेत. एनएचआरसी च्या प्रियांक कानूनगो यांनी म्हटले आहे कि जाणुन बुजून हिंदू मुलींना निशाणा बनवले जात आहे.

### 'लव्ह जिहाद'च्या संदर्भातील विविध सर्वेक्षणाचे अहवाल !

देशातील 'लव्ह जिहाद'च्या संदर्भात एक अहवाल समोर आला आहे. यानुसार ५३ टक्के लोकांनी सांगितले की, मुसलमान पुरुष 'लव्ह जिहाद'मध्ये सहभागी आहेत, असे म्हटले आहे. या संदर्भातील सर्वेक्षणामध्ये १ लाख ४० सहस्र लोकांचे मत घेण्यात आले होते. 'इंडिया टुडे' आणि 'सी वोटर यांनी 'मूड ऑफ द नेशन' अंतर्गत हे सर्वेक्षण केले होते. यात इंडिया टुडेने १ लाख ४० सहस्र ९१७ लोकांना प्रश्न विचारले, तर सी वोटरने १ लाख ५ सहस्र लोकांच्या मुलाखतींचे विश्लेषण केले. त्यानंतर त्यांनी निष्कर्ष काढला.

लव्ह जिहादचे भयावह सत्य नाकारणे म्हणजे न्यायव्यवस्था,

### पोलिस यंत्रणा आणि प्रशासन यांना खोटे ठरवणे होय !

अनेक तथाकथित पुरोगाम्यांनी 'लव्ह जिहाद' नाकारले असले, तरी केरळ उच्च न्यायालय, कर्नाटक सीआयडी व अन्य यंत्रणांनी याचा स्पष्ट उल्लेख केलेला आहे. उत्तर प्रदेश, गुजरात, मध्यप्रदेश या राज्यांनी त्याविरोधात कायदे केल्याचा अर्थ 'तो अस्तित्वात आहे', हेच स्पष्ट होते. कित्येक चॅनल्सही आता लव्ह जिहादचे दरपत्रक (कुठल्या जाती-धर्माच्या मुलीला प्रेमात पाडल्यास किती पैसे मिळणार याचे पत्रक) प्रसिद्ध करत आहेत. कायद्यानेच बघायचे झाले, तर लव्ह जिहादचे असंख्य पुरावे उपलब्ध आहेत. आणि दररोज नवीन तक्रारी मोठ्या प्रमाणात प्रविष्ट होत आहेत. तेव्हा प्रश्न असा की, पुरावे आणि सत्य समोर असतानाही काही मंडळी सत्य नाकारण्याची चिवट भूमिका घेत आहेत. हे म्हणजे जिहादींना पाठिंबा देणे आणि न्यायव्यवस्था, पोलिस यंत्रणा आणि प्रशासन यांना खोटे ठरवणे नव्हे का?

### लव्ह जिहादचे अस्तित्व नाकारणे म्हणजे समाजाची दिशाभूल करण्याचे षड्यंत्रच!

'लव्ह जिहाद' ही धार्मिक युद्धातील एक छुपी रणनीती आहे. इस्लामी आक्रमणांतील 'माल-ए-गनीमत' संकल्पनेचा आधुनिक अवतार म्हणजेच लव्ह जिहाद! साम, दाम, दंड, भेद या नीतींनी हिंदु तरुणींना जाळयात अडकवून त्यांचे धर्मांतर, फसवणूक, अत्याचार हे जिहादी मानसिकतेचे विकृत स्वरूप आहे. दिल्लीत आफताब पूनावाला याने हिंदु युवती श्रद्धा वालकरचे ३५ तुकडे केल्याची घटना घडली होती. श्रद्धाची हत्या हे एकमेव प्रकरण नाही. त्यापूर्वी आणि नंतरही निधी गुप्ता, अंकिता सिंह, निकिता तोमर, काजल, मानसी दीक्षित, तनिष्का शर्मा, खुशी परिहार, वर्षा चौहान, हिना तलरेजा आदी हिंदु तरुणींसमवेतही अशाच प्रकारची क्रूरता झाली आहे. 'दी केरला स्टोरी या चित्रपटाने मांडलेले वास्तव केवळ केरळ राज्यापुरते मर्यादित नसून या जिहादी षड्यंत्राची व्याप्ती देशभरातच नव्हे तर जगभरात मोठ्या प्रमाणात उघडकीस येत आहे. सध्या लव्ह जिहादच्या आणि महिलांवरील अत्याचाराच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. अनेक मुलींचे मृतदेह बंद सुटकेसमध्ये मिळाले आहेत. तरीही देशातील धर्मनिरपेक्षता वाद्यांनुसार हा 'लव्ह जिहाद' नाही, तर मग काय आहे ? जेव्हा एखादी तरुणी लव्ह जिहादमध्ये फसते, तेव्हा फार मोठ्या जिहादी लोकसमुहाचा व्यापक कट त्यामागे असतो, असे सखोल निरीक्षणानंतर जवळपास प्रत्येक प्रकरणात दिसून आले आहे. अपवाद असतीलच तर हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच आहेत. त्यामुळे लव्ह जिहादचे अस्तित्व नाकारणे म्हणजे समाजाची दिशाभूल करण्याचे षड्यंत्रच आहे.

### लवकर कठोर कायदा करण्याची आवश्यकता आहे !

'द केरल स्टोरी'चे निर्माते विपुल शाह यांनी धर्मांतराला बळी पडलेल्या २६ पीडित मुलींना समाजासमोर आणले होते.

२६ पीडित मुली पत्रकार परिषदेच्या माध्यमातून समोर येणे, म्हणजे 'धर्मांतर आणि आतंकवाद अस्तित्वात आहे', हे सिद्ध होते ! तसेच भोपाळ रॅकेट संदर्भात एका खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी तक्रार केली होती की मुस्लीम समाजातील एक समूहाने त्यांचे शोषण केले आहे. २० वर्षां पूर्वीपासून अगदी उघडपणे संपूर्ण भारतात ही प्रकरणे चालू होती. त्याची भयावहता अधिक असूनही राजकीय पटलावर दुर्दैवाने गेली कित्येक वर्षे हे आक्रमण चक्क नाकारले जात होते, लव्ह जिहादचा वणवा आटोक्याबाहेर गेला असतांना सुद्धा काही समाजकंटक 'लव्ह जिहाद' म्हणजे राजकीय खेळी, खोटे प्रचार तंत्र असे सांगून आगीत तेल ओतण्याचे काम करत आहेत. मुळात 'लव्ह जिहाद' ही संकल्पना नाही तर एक महाभयंकर कटु सत्य आहे.

हे षडयंत्र मोडून काढण्यासाठी वास्तव घटनांकडे, पीडितांच्या अनुभवांकडे आणि तपास यंत्रणांच्या नोंदींकडे डोळसपणे पाहणे आवश्यक आहे. यासंबंधी अनेक घटनांचे वास्तव, न्यायालयीन निरीक्षणे, तपास यंत्रणांचे निष्कर्ष आणि राज्यस्तरीय कायदे हे सर्व एकच गोष्ट स्पष्ट करतात 'लव्ह जिहाद' ही काल्पनिक संकल्पना नाही, तर एक संगठित, योजनाबद्ध क्रूर षडयंत्र आहे. यावर निष्क्रिय राहणे म्हणजे भविष्यातील हजारो श्रद्धा, निकिता, अंकिता यांना मरणाच्या कुशीत ढकलणे होय. त्यासाठी केंद्र व राज्य शासनांनी 'लव्ह जिहाद'च्या संकल्पनेवर आधारित घटनासंमत, कठोर आणि प्रभावी कायदे तात्काळ करावेत. या कायद्यांची अंमलबजावणी पक्षनिष्ठेच्या पलीकडे जाऊन निष्पक्षपणे व्हावी. तसेच 'लव्ह जिहाद' ला खोटी संकल्पना भासवून समाजाची दिशाभूल करणाऱ्यांना कठोर शासन करावे. ही काळाची गरज झाली आहे.

## अवैधरित्या सावकारी करणाऱ्या दोघांविरोधात रायगड पोलिसांची कारवाई

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : अवैधरित्या सावकारी करून जनतेची पिळणूक करून लुट करणा-या पेण येथील सावकारांवर रायगड पोलिसांची कारवाई केली आहे. रायगड जिल्हा पोलिस दलाच्या पोलिस अधिक्षक श्रीमती आँचल दलाल मॅडम यांना पेण तालुका जिल्हा रायगड येथील सावकारी जाचाला व पिळवणूकीला कंटाळलेले काही त्रस्त नागरीक भेटले. त्यांनी पेण शहर येथे राहणारे परवानाधारक सावकार सूर्यकांत जोमा पाटील वय-70 वर्षे भरत सूर्यकांत पाटील वय-35 वर्षे दोन्ही राहणार रूम नं.301, 302, आमंत्रण बिल्डींग, गोदावरीनगर, चिंचपाडा, ता.पेण जिल्हा रायगड हे अवैधरित्या सावकारी व्यवसाय करून, जनतेची पिळवूक करून लुट करीत असल्याच्या तक्रारी केल्या. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी त्यांचे विरोधात लेखी तक्रारी दिल्याने सदरबाबत मा.पोलिस अधिक्षक श्रीमती आँचल दलाल यांनी पोलिस निरीक्षक मिलींद खोपडे, पोलिस निरीक्षक स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, अलिबाग रायगड यांना 'सहाकार पणन व वस्त्रोदयोग' अलिबाग या विभागशी संपर्क करून तात्काळ पुढील योग्य ती कायदेशीर कारवाई करणेबाबत आदेशीत केले.

प्रमोद जगताप, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अलिबाग जिल्हा रायगड यांना प्राप्त तक्रारीची माहीती दिली. त्यानंतर सपोनि/भास्कर जाधव व स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा स्टाफ संयुक्तरित्या सहकार विभागील अधिका-यांसह वेगवेगळी पथके सदर कारवाईकामी तयार करून दिनांक 18/7/2025 रोजी पेण शहर येथे राहणारे परवानाधारक सावकार सूर्यकांत जोमा पाटील वय 70 वर्षे भरत सूर्यकांत पाटील वय 35 वर्षे यांचे राहते घर रूम नं. 301, 302, आमंत्रण बिल्डींग, गोदावरीनगर, चिंचपाडा, पेण, ता. पेण जिल्हा रायगड तसेच हॉटेल रायगड गोमांतक, पेण, ता. पेण, जिल्हा रायगड या ठिकाणी एकाचवेळी गोपनियता राखुन छापे मारण्यात आले. सदर छापा कारवाईमध्ये सहकारी संस्था विभागाने पंचासमक्ष सविस्तर पंचनामे केले असुन त्यादरम्यान तेथुन सदर सावकारांनी कर्जदारांकडुन लिहुन घेतलेल्या वचनचिठ्ठया, धनादेश तसेच इतर संशायास्पद कागदपत्रे ताब्यात घेतली आहेत. सदरबाबतची पुढील कायदेशीर कारवाई सुभाष काळे, सहा. निबंधक, सहकारी संस्था, पेण हे त्यांच्या अधिकारीतेत करीत आहेत. सदरची कारवाई मा. पोलिस अधिक्षक सो, आँचल दलाल मॅडम यांचे आदेशाने व मा. अपर पोलिस अधिक्षक अभिजीत शिवथरे यांचे मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे, पोलिस निरीक्षक मिलींद खोपडे, सहा. पोलिस निरीक्षक भास्कर जाधव, सहा. पोउपनि प्रसाद पाटील, सहा. पोउपनि प्रसन्ना जोशी, पोहवा/2233 मोरेश्वर ओंबळे, मपोहवा/123 अस्मिता म्हात्रे, मपोहवा/34 रेखा म्हात्रे, पोहवा/2388 सचिन वावेकर, मपोहवा/135 झुलीता भोईर, पोशि/2030 बाबासो पिंगळे, पोशि/454 अक्षय जगताप, पोशि/2216 ईश्वर लांबोटे, पोशि/678 ओमकार सोंडकर या पोलिस पथकाने केलेली आहे.

## रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याणच्या अध्यक्षपदी धीरेंद्र सिंह

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याणच्या अध्यक्षांचा पदग्रहण सोहळा पार पडला. धीरेंद्र सिंह तसेच नामदेव चौधरी यांनी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१४२ चे प्रांतपाल हर्ष मकोल यांच्या उपस्थितीत अनुक्रमे अध्यक्ष व सचिव पदाचा पदभार स्वीकारला. रोटरी डिस्ट्रिक्ट ३१४२ चे अनेक मान्यवरही याप्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



नवनिर्वाचित अध्यक्ष धीरेंद्र सिंह यांनी रोटरीच्या इतिहासाला जागून निरनिराळ्या समाजोपयोगी कामांवर भर देणार असल्याचे जाहिर केले. त्याची सुरुवात 'थालेसेमियाचे उच्चाटन' या उद्देशाने गेल्या १५ दिवसांत २ रक्तदान शिबिरे आयोजित करून तब्बल १२५ युनिट रक्त जमा करून झाली. त्याचबरोबर, रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याणच्या पुढाकाराने कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर या भागातील सर्व रोटरी क्लब मिळून उल्हासनगर येथील सरकारी मध्यवर्ती रुग्णालयातील थालेसेमिया केअर सेंटर दत्तक घेण्यात आले आहे.

रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याण तर्फे गेली सहा वर्षे रोटरी दिव्यांग सेंटर अव्याहतपणे चालू आहे. या सेंटरमध्ये हात किंवा पाय गमावलेल्या गरजू दिव्यांगांना मोफत कृत्रिम हात वा पाय बसवून दिले जातात. वेगवेगळ्या स्तरावरील लहान बाळांपासून वृद्धांपर्यंत सर्वांनाच या सुविधेचा लाभ होत आहे. या व्यतिरिक्त ग्रामीण भागांतील शाळांची डागडुजी, अद्ययावत सुविधा यासाठी रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याण कायम आग्रही आहे. रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याण समाजातील विविध स्तरांतील नागरिकांसाठी निरनिराळ्या विषयांवर (शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, जल नियोजन, महिला व बालविकास इत्यादी) कामे करत आली आहे व यापुढेही करत राहील अशी ग्वाही अध्यक्ष धीरेंद्र सिंह यांनी दिली.

या सर्व उपक्रमांसाठी निधी संकलनाच्या हेतूने रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याण दर वर्षी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मॅराथॉन स्पर्धेचे आयोजन करत असते. यावर्षी २३ नोव्हेंबर २०२५ रोजी होणाऱ्या मॅराथॉन मध्ये सर्व नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे असे आवाहन ही केले. यानंतर माजी सचिव रमेश मोरे यांनी आभार प्रदर्शन केले.

नियमित वाचा
दै. ठाणे
जीवनदीप वार्ता

## एमआयडीसी मधील जीर्ण जुन्या इमारतींची रिडेव्हलपमेंट मागणी मान्य होणार !

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : एमआयडीसी नियमांत दुरुस्ती करून एमआयडीसी निवडी विभागातील 35 ते 40 वर्षे झालेल्या जीर्ण जुन्या इमारतींना रिडेव्हलपमेंट करीता परवानगी द्यावी आणि त्यासाठी खास एक बैठक लावावी अशी विधिमंडळात आमदार राजेश मोरे यांनी केलेल्या मागणी संबंधित मंत्र्यांनी मागणीला होकार दिला. परिणामी आता लवकरच ही एमआयडीसी मधील रिडेव्हलपमेंट मागणी प्रत्यक्षात मान्य होणार असे दिसत आहे.

शहरात धोकादायक इमारतींची प्रकरणे लक्षवेधी होत आहेत. मागील काही महिन्यांपासून एमआयडीसी मधील काही धोकादायक इमारतींना कल्याण डोंबिवली महापालिका आणि पोलिसांनी नोटीस दिली होती. त्यामुळे हा विषय सारखाच प्रकाशात येत होता. एमआयडीसी प्रशासनाची किचकट नियमावली आणि सभासद संख्या वाढ बाबत विषय विकासकांकडून बोलला जात होता. तसेच याबाबतची विचारणा कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांच्याकडे होत होती.

त्यामुळेच आणि लोकांच्या गरजेपोटी आमदार मोरे यांनी विधिमंडळात यावर लक्षवेधी मांडून या विषयाला चालना दिली. राजेश मोरे यांनी अधिवेशनात एक लक्षवेधी मांडून डोंबिवली एमआयडीसी निवासी मधील जुन्या धोकादायक झालेल्या इमारतींच्या रिडेव्हलपमेंट विषय पटलावर आणून सबंधित मंत्र्यांकडून सकारात्मक उत्तर मिळविले आहे.

परिणामी आता एमआयडीसी विभागातील 35 ते 40 वर्षे झालेल्या जीर्ण जुन्या इमारतींना रिडेव्हलपमेंट करीता होकार मिळाल्याने लवकरच एमआयडीसी मधील रिडेव्हलपमेंट मागणी प्रत्यक्षात मान्य होणार असे दिसून येत आहे.



# डोंबिवली-कल्याणमध्ये विजेचा लपंडाव ▌स्मार्ट सिटीत विद्युत विभागाचा अनागोंदी कारभार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली: कल्याण डोंबिवली शहर आता स्मार्ट सिटीत परिवर्तन होत आहे.शहरात उंच इमारती,उड्डाण पूल,मेट्रो शहर सुशोभीकरणाचे काम जोरात सुरू आहे;मात्र डोंबिवली व कल्याण शहरातील नागरिक मागील १६ दिवसांपासून सतत लोडशेडिंगचा सामना करत आहेत.मग स्मार्ट सिटी झाल्यास आणखी किती त्रास सहन करायला लागणार आहे.अशी कल्याण डोंबिवली करांच्या नागरिकांची अवस्था झाली आहे.

४ जुलै रोजी पडघा येथून येणाऱ्या दोन मुख्य विद्युत वाहिन्यांपैकी एक वाहिनी नादुरुस्त झाली असून, संपूर्ण शहराचा भार दुसऱ्या वाहिनीवर टाकण्यात आला आहे. यामुळे दररोज अनियमित व अचानक वीज खंडित होण्याच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे.

स्मार्ट सिटीच्या नावाखाली जाहिरातबाजी करणारे सत्ताधारी नेते, प्रशासकीय यंत्रणा आणि लोकप्रतिनिधी यांना या गंभीर प्रश्नाची जाणीव असूनही कुणीही ठोस पावले उचलताना दिसत नाहीत. नागरिक रात्रभर घामाघूम, रुग्णालयांतील सेवांवर परिणाम, विद्यार्थ्यांचा अभ्यास बाधित होणे आणि ऑफिसमधील कामकाज ठप्प होणे हे सर्व घडत असतानाही प्रशासन शांत आहे.

या परिस्थितीचा तीव्र निषेध करत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने महावितरणच्या अधिकाऱ्यांशी थेट संपर्क साधून,तातडीने ही वाहिनी दुरुस्त करण्याची मागणी केली आहे. अन्यथा याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा ठाम इशारा शिवसेनेने दिला आहे.

शहरातील नागरिकांचा संयम संपत चालला आहे. हे केवळ तांत्रिक प्रश्न नाही, तर नागरिकांच्या हक्काचा, सुरक्षिततेचा आणि भविष्यातील प्रगतीचा प्रश्न आहे. शिवसेना या प्रश्नावर रस्त्यावर उतरेल आणि नागरिकांच्या हक्कासाठी लढा उभारेल असेही पक्षातर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

# दुर्गाडी किल्ल्याची संरक्षक भिंत कोसळ्याप्रकरणी अधिकाऱ्यांवर कारवाई करा

## – आमदार विश्वनाथ भोईर यांची अधिवेशनात मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या ऐतिहासिक दुर्गाडी किल्ल्याची संरक्षक भिंत काही आठवड्यांपूर्वी कोसळण्याची घटना घडली होती. याप्रकरणी संबंधित ठेकेदाराला ब्लॅकलिस्ट करून या कामामध्ये हलगर्जीपणा करणाऱ्या शासनाच्या अधिकाऱ्यांवरही कारवाई करण्याची मागणी कल्याण पश्चिमेचे आमदार विश्वनाथ भोईर यांनी केली आहे. सध्या सुरू असलेल्या राज्याच्या पावसाळी अधिवेशनात आमदार भोईर साहेब यांच्यातर्फे औचित्याच्या मुद्द्याद्वारे ही मागणी करत शासनाचे लक्ष वेधण्यात आले.

कल्याण नगरीतील ऐतिहासिक दुर्गाडी किल्ला हा केवळ एक वास्तू नसून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे आणि हिंदवी स्वराज्याचे ते एक प्रतीक आहे. याच किल्ल्याच्या पायथ्याशी छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या पहिल्या आरमाराची स्थापना केली होती. त्यामुळे केवळ केवळ इतिहास संशोधक आणि गडप्रेमींच्याच नव्हे तर इथल्या सामान्य नागरिकांच्या मनातही या दुर्गाडी किल्ल्याविषयी विशेष आस्था असल्याचे आमदार विश्वनाथ भोईर यांनी सभागृहात सांगितले.

तर काळाच्या ओघात हा किल्ला जीर्ण झाल्याने राज्य सरकारकडून त्याची डागडुजी आणि नूतनीकरणाचे काम केले जात आहे. यासाठी कोट्यवधींचा निधीही सरकारने उपलब्ध करून दिला असून पुरातत्व विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून हे काम केले जात आहे. मात्र या कामामध्ये प्रचंड अनियमितता सुरू असून काही आठवड्यांपूर्वी या किल्ल्याची निर्माणाधीन असलेली संरक्षक भिंत कोसळण्याची घटना घडली. त्याठिकाणी पाहणी करत असतानाच या संरक्षक भिंतीचा आणखी एक मोठा भाग आपल्या समक्ष खाली पडल्याची माहिती आमदार विश्वनाथ भोईर यांनी सभागृहाला दिली.

या घटनेने शिवप्रेमी, दुर्गप्रेमी आणि सामान्य कल्याणकर नागरिकांमध्ये अतिशय संतापाची भावना निर्माण झाली आहे. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेता यामध्ये हलगर्जीपणा करणाऱ्या ठेकेदाराला ब्लॅकलिस्ट करावे. आणि इतके महत्त्वाचे काम सुरू असतानाही महिनोमहिने त्याठिकाणी न येणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवरही कडक कारवाई करण्याची मागणी आमदार विश्वनाथ भोईर यांनी यावेळी केली.

# कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या सेवानिवृत्त आणि कार्यरत कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ!

## कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण!

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता




कल्याण : महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या निर्देशानुसार आणि अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, सामान्य प्रशासन विभागाच्या उपायुक्त वंदना गुळवे यांच्या मार्गदर्शनाखाली सामान्य प्रशासन विभागातील सहा. आयुक्त सुषमा मांडगे तसेच अधीक्षक सुनील बागुल, श्रुती कानिटकर ,संजय गोरुले आणि त्यांच्या टीमच्या गेले काही दिवसांच्या अथक प्रयत्नांमुळे वर्ग 3 आणि वर्ग 4 मधील 888 कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळाला आहे. उर्वरित पात्र कर्मचाऱ्यांना देखील हा लाभ लवकरच प्राप्त होणार आहे.

या आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळणे बाबत कर्मचारी वर्गाचा अनेक दिवसांचा पाठपुरावा लक्षात घेऊन आयुक्त अभिनव गोयल यांनी ही योजना लवकरात लवकर लागू करण्याबाबतचे निर्देश सामान्य प्रशासन विभागास दिले होते त्याला अनुसरून सामान्य प्रशासन विभागाच्या उपायुक्त वंदना गुळवे आणि त्यांच्या कर्मचारी वर्गाने या योजनेच्या अंमलबजावणी सुरुवात करून कर्मचाऱ्यांचा महत्त्वाचा प्रश्न मार्गी लावला आहे.

यामध्ये वर्ग 3 चे 95 सेवानिवृत्त , वर्ग 3 चे 386 कार्यरत कर्मचारी आणि वर्ग 4 चे 407 कर्मचारी अशा सुमारे 888 कर्मचारी वर्गास आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळाल्यामुळे कर्मचारी वर्गात आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण पसरल्याचे दिसून आले.

यापूर्वी माहे मार्च 25 मध्ये वर्ग- 4च्या 1934 कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आला होता. पुढील टप्प्यामध्ये वर्ग 2 व वर्ग 1 च्या अधिकारी वर्गास आश्वासित प्रगती योजनेचा लाभ दिला जाणार आहे.

प.पू.स.रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्ट
भोगावती नगर(तानसा), ता.शहापूर, जि. ठाणे



उपासनारुपी साधनांची जोड नसलेल्या व्यक्तींची बुद्धी स्थिर नसते. परमेश्वराविषयी प्रीतीभावना, भक्ती नसणाऱ्या नास्तिक मनुष्याला शांतीही नसते, अशा अशांत व्यक्तीस सुख कुठून लाभेल? कारण जसे सोसाट्याचा वारा सुटला असता पाण्यावर तरंगणारी नौका वाऱ्याच्या दिशेनुसार व वेगानुसार भरकटते तसेच विषयांत भरकटणाऱ्या इंद्रियांपैकी ज्या बरोबर मन राहते त्या मनावर नियंत्रण न राहता ते मन सातत्याने विषय भोगात गुंतले असता बुद्धीचा नाश होऊन साधकाचे पतन होते.

गुरूमाऊली - प.पू.स.अलोकनाथजी महाराज

### मोहोने एनआरसी परिसरात

# बिबट्याच्या वावराने भीतीचं वातावरण

## बिबट्याचा व्हिडीओ वायरल झाल्याने नागरिकांना सतर्कतेचं आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : मोहोने गावातील एनआरसी परिसरात बिबट्या सारखा वन्यप्राणी फिरताना आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. ही घटना अदानी कंपनीच्या सुरक्षारक्षकांच्या निदर्शनास आली असून, रात्री गस्त घालताना जंगलाच्या सीमेलगत बिबट्या सदृश्य प्राण्याला पाहिल्याचे त्यांनी सांगितले. या घटनेनंतर नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन केले आहे.

एनआरसी परिसर हा वन्यप्राण्यांच्या नैसर्गिक वावराचा भाग असल्याने यापूर्वीही येथे प्राणीदर्शनाच्या घटना घडल्या आहेत. मात्र यावेळी बिबट्यासारखा प्राणी थेट वस्तीच्या आसपास दिसल्याने नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे वनविभागाने तातडीने कारवाई करावी, अशी मागणीही होत आहे.

यासंदर्भात कल्याण वनविभागाचे अधिकारी निलेश आखाडे यांनी सांगितले की, "घटनेची माहिती मिळताच संबंधित बीटचे कर्मचारी सानप, भाऊसाहेब आणि इतरांसह घटनास्थळी पाठवण्यात आले असून, स्थानिकांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत." त्यांनी असेही स्पष्ट केले की, "मानवी वस्तीत चुकून शिरलेला बिबट्या अथवा चित्त्यासदृश्य प्राणी सहसा फार वेळ थांबत नाही, तो काही किलोमीटर लांब जातो. त्यामुळे नागरिकांनी घाबरू नये, पण दक्षता आवश्यक आहे."

वनविभाग आणि प्रशासनाने घटनास्थळी पहाणी सुरू केली असून, परिसरात गस्त वाढवण्यात आली आहे. लवकरच प्राण्याची ओळख निश्चित करून आवश्यक ती उपाययोजना केली जाईल, असा विश्वासही स्थानिक प्रशासनाने व्यक्त केला आहे.

काल मध्यरात्री एनआरसी कंपाउंड अदाणी वेअरहाऊस जवळील रस्त्याकडून मौजे आंबिवली स नं.11,25,27 मधील वनक्षेत्रकडे जातांना बिबट्या हा वन्यप्राणी स्थानिक नागरिकांना दिसून आला होता. तसेच आज सकाळच्या सुमारास मौजे मानिवली गावाकडील भागात बिबट्या हा वन्यप्राणी दिसून आल्याची बातमी मिळाली होती. त्या अनुषंगाने या दोन्ही घटनास्थळी जाऊन पाहणी केली व तेथील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले व बिबट्या वन्यप्राण्याबाबत जनजागृती केली असल्याचे आखाडे यांनी सांगितले.

# पडघा टोलनाका आंदोलनकर्ते आणि जिल्हाधिकारी बैठकीत सकारात्मक चर्चा



पडघा : भिवंडी तालुक्यातील पडघा टोल नाक्यावर मोर्चा नेऊन आंदोलन करणारे आंदोलन कर्ते व जिल्हाधिकारी ठाणे यांच्यात पार पडलेल्या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली असुन सर्वांची संयुक्त कमीटी बनवुन रस्त्यांचा आढावा घेणार असल्याचे सुतोवाच जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी केले.

शिवसेना ठाकरे, मनसे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) व इतर सामाजिक संघटना यांच्या वतीने मुबई नाशीक महामार्गावरील विवीध मागण्यासाठी १७ जुलै रोजी भिवंडी तालुक्यातील पडघा टोलनाक्यावर मोर्चा नेऊन टोल बंद आंदोलन करण्यात आले होते. त्यांची दखल जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या कडुन घेण्यात आली. व त्याबाबत प्रमुख शासकीय अधिकारी, पोलीस अधीकारी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, टोल वसुली कंपनी, सार्वजनिक बांधकाम विभाग व आंदोलनकर्ते यांची संयुक्त बैठक जिल्हाधिकारी ठाणे यांच्या दालनात शुक्रवारी घेण्यात आली. वडपे ते गोंदे पर्यंत मुबई नाशीक महामार्ग बिओटी तत्त्वावर एका कंपनीला काम दिले असून ते टोल वसुली करतात मात्र रस्त्याच्या दुरुस्ती देखभाल व इतर सुविधा देण्याचे काम करत नसुन त्यांच्या हलगर्जीपणामुळे अनेक निरपराध नागरीकांचा नाहक बळी गेल्याचे सांगण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी आंदोलनकर्त्यांच्यां सर्व तक्रारी निवेदन ऐकुन घेऊन राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांनी रस्त्याची कामे न करणाऱ्या टोल वसुली कंपनीवर कारवाई किंवा त्यांना काळया यादीत का टाकत नाही तसेच आवश्यक तेथे कामे होत नसल्याने टोल वसुली कंपनी व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अपघातांना आमंत्रण देते का असा सवाल उपस्थित करून नागरीकांचे जिव कसे वाचतील यासाठी प्रथम प्राधान्य द्या असे सुनावले. आंदोलनकर्त्यांच्यां वतीने उपस्थीत शिवसेना नेते व माजी खासदार राजन विचारे यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व टोल वसुली कंपनीच्या भोंगळ कारभारामुळे मुबंई नाशीक महामार्गावर 12 वर्षात अनेक नागरीकांचा बळी गेला असेल तर आपण कोणासाठी काम करीत आहोत यांचा विचार करून जिवंत माणसांसाठी कामे करा महामार्गावरील विकासकांसाठी नाही.असे महामार्ग प्राधिकरण अधीकाऱ्यांना सुनावले तसेच लवकरात लवकर कामे न झाल्यास राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व टोल वसुली कंपनी यांच्यावर मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करा अशी मागणी केली. तर पडघा, वांसीद, आसनगाव, शहापुर, कसारा वाशाळा येथे निकृष्ठ दर्जाच्या ब्रीज, रस्त्याची कामांबाबत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अधीकारी श्रीकांत ढगे व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित असलेल्या भिवंडीतील विविध रस्त्याबाबत नागरीकांनी विविध प्रश्न उपस्थित करून उपकार्यकारी अभियंता दत्तु गिते यांना कोंडीत पकडल्याने काही काळ येथे तणावाचे वातावरण होते. यावेळी मनसे प्रदेश उपाध्यक्ष डी. के. म्हात्रे, जिल्हा संघटक मदन अण्णा पाटील शिवसेना ठाकरे उपजिल्हाप्रमुख प्रकाश भोईर, मनसे भिवंडी लोकसभा जिल्हाप्रमुख शैलैश बिडवी, तालुकाध्यक्ष विकास जाधव राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार) तालुकाध्यक्ष गणेश गुळवी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक महेंद्र पाटील सरपंच रविंद्र विशे सामाजिक कार्यकर्ते भगवान सांबरे, पंकज भोईर, ग्रामपंचायत सदस्य महेश राऊत यांनी चर्चेत भाग घेतला तर यावेळी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, पोलीस अधीक्षक डॉ. डी. एस. स्वामी, स्थानिक गुन्हे शाखेचे सुरेश मनोरे, विभागीय पोलीस उपअधीक्षक राहुल झाल्टे, उपस्थित होते.

# कल्याण मध्ये एम.डी. व 'गांजा' अंमली पदार्थ विक्री करीता बाळगणाऱ्या आरोपींना अटक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण परिमंडळ ३ अंतर्गत पोलीस उपायुक्त यांच्या विशेष कारवाई पथकाने, व खडकपाडा पोलीस ठाणे यांनी परिमंडळात बेकायदेशीर अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या आरोपींना अटक करण्यात आली आहे.

शुक्रवारी बाजारपेठ पोलीस ठाणे हददीत फोर्टीस हॉस्पीटल समोर ए.पी.एम.सी मार्केटच्या मागील रोडवर विशेष कारवाई पथक गस्त घालत असताना दोन इसम मेफेड्रॉन (एम.डी) हा अंमली पदार्थ विक्री करण्याच्या उद्देशाने मिळुन आल्याने त्याबाबत अधिक तपास केले असता त्याच्याकडे ११० ग्रॅम वजनाचा मेफेड्रॉन (एम.डी) अंदाजे २२ लाख रुपये किंमतीचा हा अंमली पदार्थ मिळून आला. याप्रकरणी आरोपी मोहम्मद कैफ मन्सुर शेख, वय २४ वर्षे रा. बैलबाजार व फरदीन आसीफ शेख वय २४ वर्षे रा.ड्रिम कॉम्पलेक्स, कोनगांव भिंवडी यास ताब्यात घेण्यात आले. आरोपींवर बाजारपेठ पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून याबाबत पुढील तपास चालु आहे. तर गुरुवारी खडकपाडा पोलीस ठाणे हददीत योगी धाम या ठिकाणी रवि शिवाजी गवळी वय. ३० वर्षे रा. अनुपमनगर याच्याकडे ११२० ग्रॅम इतका अंदाजे रू.२५ हजार किंमतीचा गांजा हा अंमली पदार्थ विकी करण्याच्या उद्देशाने मिळून आल्याने आरोपींवर खडकपाडा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करून पुढील तपास चालु आहे. हि कामगिरी परिमंडळ ३ कल्याण विशेष कारवाई पथक व पोलीस ठाणे यांनी संयुक्तपणे केली आहे. अशा प्रकारे परिमंडळ ३ कल्याण मध्ये अंमली पदार्थ विकी विरूध्द कारवाई सुरू राहणार असल्याची माहिती सहायक पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे यांनी दिली.



**कल्याण पश्चिम मध्ये छत्रपती शिवाजी महाराज चौकात ओवरफ्लो झालेल्या या चेंबरमधून नाल्याचे पाणी बरेच दिवस झाले सतत वाहत असल्यामुळे त्या एरियातील दुकानदारांना तसेच ये-जा करणाऱ्या पादचाऱ्यांना याचा त्रास होत आहे. जवळ असलेल्या कल्याण मनपाकडून ह्याची दखल घेण्यात यावी असे नागरिक मागणी करत आहेत.**

### रोटरी क्लब ऑफ कल्याण रिव्हरसाईडतर्फे

# क्षयरोगी रुग्णांना पोषण किट वाटप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : रोटरी क्लब ऑफ कल्याण रिव्हरसाईड, कल्याण डोंबिवली महानगरपालिका व रोटरी क्लब ऑफ ठाणे प्रीमियम यांच्या संयुक्त विद्यमाने क्षयरोगी रुग्णांसाठी पोषण किट वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या "टीबी मुक्त भारत अभियान" व "निक्षय मित्र योजना" अंतर्गत राबविण्यात आला.

क्षयरोग हा गंभीर आणि जीवघेणा आजार असून कुपोषण व अशक्तपणामुळे तो अधिक घातक ठरतो. त्यामुळे योग्य आणि संतुलित आहार अत्यावश्यक असतो. हे लक्षात घेऊन, रोटरी क्लब ऑफ कल्याण रिव्हरसाईडने 145 क्षयरोगी रुग्णांना पोषणयुक्त अन्नधान्य किट्स वाटप केल्या. या किट्समध्ये गहू पीठ, विविध डाळी, सोयाबीन आणि खाद्यतेल यांचा समावेश होता – जे रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी आणि पुनर्प्राप्तीला गती देण्यासाठी उपयुक्त आहेत.

पोषण किट्समध्ये अत्यावश्यक पोषक घटकांचा समावेश करून रुग्णांची अशक्तपणा दूर करण्यास मदत केली. रोटरी क्लब ऑफ कल्याण रिव्हरसाईडने पुढील एक वर्षासाठी दरमहा पोषण किट्स वाटप करण्याचा संकल्प केला आहे. हा उपक्रम आचार्य अत्रे रंगमंदिर, कल्याण येथे आयोजित करण्यात आला. या उपक्रमाचे उद्घाटन रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट 3142 चे गव्हर्नर रोटेरियन हर्ष मकोल यांच्या उपस्थितीत करण्यात आले. त्यांनी आपल्या भाषणात टीबी मुक्त भारत अभियान व निक्षय मित्र योजना यांचे उद्दिष्ट स्पष्ट केले आणि रोटरी क्लब ऑफ कल्याण रिव्हरसाईडच्या समाजाभिमुख कार्याचे कौतुक केले.

कार्यक्रमाला डिस्ट्रिक्ट गव्हर्नर हर्ष मकोल, समीर सारंगधर, क्लब अध्यक्ष रोटेरियन महेश तिबे, सचिव संजय माचवे, प्रकल्प प्रमुख रोटेरियन डॉ. अनंत इतकर, डॉ. अवधूत शेट्ये, वैभव ठाकरे, योगेश कल्हापुरे, नरेश पटेल, डॉ. आशीष जैन आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमास कल्याण डोंबिवली महापालिकेच्या आरोग्य विभागाचे मोलाचे सहकार्य लाभले. रोटरी क्लब ठाणे प्रीमियम, केडीएमसी व रोटरी क्लब ऑफ कल्याण रिव्हरसाईड यांची संयुक्त भागीदारी या यशस्वी उपक्रमाचा प्रमुख आधार ठरली.

# सोनी क्षीरसागर यांच्या वतीने जिल्हा परिषद शाळेत वह्या वाटप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



सोनी क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त पिसवली जिल्हा परिषद शाळा तसेच अडवली जिल्हा परिषद शाळा येथे गरजू साडेचारशे ते पाचशे विद्यार्थ्यांना वह्या व खाऊ वाटप करण्यात आले.

कल्याण : नुकत्याच भाजपमध्ये प्रवेश झालेल्या सोनी क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त पिसवली जिल्हा परिषद शाळा तसेच अडवली जिल्हा परिषद शाळा येथे गरजू साडेचारशे ते पाचशे विद्यार्थ्यांना वह्या व खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष नंदू परब, समाजसेवक राजन दुबे, संदीप क्षीरसागर, अरुणा मते उपस्थित होते. तसेच अनेक मान्यवरांनी सोनी यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. पिसवली जिल्हा शाळेच्या वतीने मुख्याध्यापिका प्रतिभा पाटील, शाळेतील शिक्षिका वर्षा कदम, शीतल गोरे, अंजना विराजे, हर्षद खंबायत, शुभांगी मोरे उपस्थित होत्या.

यानंतर आडवली गावांतील विद्यार्थ्यांसोबत मुलांना वह्यांच्या प्रती, पुस्तके आणि बिस्किटे वाटून आपला वाढदिवस साजरा केला. यावेळी आडवली जिल्हा परिषदेच्या मुख्याध्यापिका कल्पना बोंबे, मनीषा वसईकर, छाया कोकडे, संगीता तायडे आणि विभा रामटेके उपस्थित होत्या. सोनी क्षीरसागर या नुकत्याच भारतीय जनता पक्षात सामील झाल्या आहेत. त्यांच्या या निर्णयाला ग्रामस्थांचा व कार्यकर्त्यांचा पूर्ण पाठिंबा मिळाला आहे.




*Printed by AIS Printing Solution Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,*
*printed at Thane and published at Building No-B-24,Room no-9,gholap Nagar, Murbad Road, Neyr Anpam Nagar Kalyan west editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.*